| | |
|---|---|
| MHNG140000282024 | दाखल तारीख: १६/०१/२०२४<br>नोंदणी तारीख : १६/०१/२०२४<br>निकाल तारीख:१२/०८/२०२६<br>कालावधी: ०२वर्ष,०६महिने,२७ दिवस |

नमुना क्र . XXXII

**भाग 'अ'**

(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ )

[फौजदारी नियमावली प्रकरण VI परिच्छेद 44(i)]

**पारशिवनी येथील न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी यांचे न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी श्री. जी. ओ. वानखडे)**

**(निकाल तारीख : १२ ऑगस्ट , २०२६)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१३/२०२४** **नि.क्र. २५**

प्रथम खबरी अहवालाचे विवरण –
प्र.ख.अ. – २८०/२०२२, दिनांक २७/०९/२०२२
पोलीस ठाणे – पारशिवनी, जि. नागपूर.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासनातर्फे,<br>पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन<br>पारशिवनी, |
| अभियोगपक्षातर्फे विव्दान विधीज्ञ | श्रीमती जे. व्ही. हेडाऊ |
| आरोपीचे नाव | १. सुभाष सुर्यभान बागडे<br>वय–४० वर्षे, धंदा– वाहनचालक,<br>रा. तामसवाडी, त. पारशिवनी जि.<br>नागपूर |

| | |
|---|---|
| | २. हिमांशू लिलाधर बांदरे<br>वय–२२ वर्षे, धंदा– वाहनचालक,<br>रा. खैरी पन्नासे त. हिंगणा जि.<br>नागपूर |
| आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ | श्री. शुभमकुमार एस. परदेशी |

**भाग 'ब'**

[फौजदारी नियमावली प्रकरण VI परिच्छेद 44(ii)]

| | |
|---|---|
| अपराध घडल्याची दिनांक | १३/०९/२०२३ |
| एफ.आय.आर. नोंदविल्याची दिनांक | १३/०९/२०२३ |
| न्यायालयात दोषारोप दाखल दिनांक | १६/०१/२०२४ |
| दोषारोप निश्चीत केल्याची दिनांक | २७/०९/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याची दिनांक | १७/०९/२०२५ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवण्याची दिनांक | --- |
| न्यायनिर्णयाची दिनांक | १२/०८/२०२६ |
| तारीख शिक्षेच्या आदेशाची, जर असेल तर | लागू नाही. |

## <u>आरोपीचा विवरण</u>

| अ. क्रं. | आरोपीचे नाव | आरोपीची अटक केल्याची दिनांक | आरोपीची जामीनावर मुक्त | आरोपींवर निश्चीत केलेले | निर्दोष किंवा दोषी | पारीत आदेश | संपरीक्षेदरम्यान आरोपी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | केल्याची दिनांक | गुन्हयांचे कलम | | | कोठडीत असल्याच कालावधी , कलम ४२८फौ. प्र.सं. |
| १.<br><br>२. | सुभाष सुर्यभान बागडे<br><br>हिमांशू लिलाधर बांदरे | ३०/०९/२०२३<br><br>२५/०९/२०२३<br>रोजी सूचनापत्र देउन सोडले | १६/०१/२०२४<br><br>१८/०१/२०२४ | भा.द.वी. १८६० चे कलम २७९,३३७ ३३८ व १८४, मोटार वाहन अधिनियम अन्वये | निर्दोष | आरोपींची निर्दोष मुक्तता | --- |

## न्यायनिर्णय

(दिनांक १२ ऑगस्ट,२०२६ रोजी अधिघोषीत)

प्रस्तुत प्रकरणी आरोपी भारतीय दंड विधान (भा.द.वी.),१८६० कलम २७९,३३७ ३३८ व १८४, मोटार वाहन अधिनियमअन्वये अन्वये दोषपात्र गुन्हयाच्या संपरीक्षेस सामोरे जात आहे.

२. अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन असे की –

फिर्यादी पो.हवा. अशोक उईके ब.नं.२९३

दि.१३/०९/२०२३ रोजी कर्त्यव्यावर हजर असतांना फोनव्दारे माहिती मिळाली की, मौजा नयाकुंड शिवार येथे अपघात झाला असुन या अपघाता मधील जखमीला ग्रामिण रूग्णालय, पारशिवनी येथे आनले आहे. जखमी नामे दिलीप जानबाजी परतेकी वय ४२ वर्ष रा. घाटपेंढरी तह.पारशिवनी हा अपघातग्रस्त स्थितीत मिळुन आला जखमीचा बयाण नोंदविला असता त्याने वयाणात सांगीतले की, मी रामटेक वरून पारशिवनी रोडने मुळगावी घाटपेंढरी येथे माझी युनीकॉर्न मो.सा. क्रएम.एच.४०.सी. आर.८८०५ ने जात असतांना सुर्योदय नगरी समोर त्याच्या खिशातुन मोबाईल पडल्याने तो मोबाईल रोडने शोधत असतांना त्याचे माझी मोटार सायकल ही रोडने पलटवित असतांना मागुन येणारी पांढऱ्या रंगाच्या कार क्र.एम.एच.४०.बी.एल.२४६८ चे चालकाने त्याचे ताब्यातील कार ही निष्काळजीपणे चालवुन त्याचे मोटार सायकल ला धडक मारली व त्यामुळे मी रोडवर मोटार सायकल सह खाली पडला . तो रोडवर खाली पडलेला असतांना मला पुन्हा धडक लागली त्यामुळे माझे उजवे पायाला व डोक्याला मार लागुन रक्त निघाले आहे. तसेच यातील मारोज्ञो कार क्र.एम.एच.४०. बी.एल.२४६८ या गाडीमधील जयंतकुमार विनायक भातकुलकर रवी रामुजी कडु वय म २७ वर्ष रा. कवठा तह. कामठी, नागपुर तसेच व महिद्र बोलोरे कार क्र.एम.एच.४०.सी.एच.०३४२ या गाडीमधील चालक नामे हिमांशु लिलाधर बांदरे यांचे बयान नोंदविले असता असे आढळले की, मोराज्ञो कार क्र.एम.एच.४०.बी.एल.२४६८ चे चालक याने गाडीचा हॉर्न देवुन हळुहळु ब्रेक मारून कार नियंत्रीत करण्याचा प्रयत्न केला परंतु कार ही पुर्णपणे नियत्रीत न होता मोटारसायकल चालकास धडकली व

तो रोडवर मोटारसायकल सह रोडवर खाली पडला त्यानंतर लगेच मागुन येणाऱ्या बोलोरो कार क्र.एम.एच.४०.सी.एच.०३४२ चे चालकाने त्याचे ताब्यातील कार ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोरोझो कार क्र.एम.एच.४०.बी.एल.२४६८ ला मागुन जोराने धडक दिली त्यामुळे मोराझो कार क्र.एम.एच.४०.बी.एल.२४६८ ही समोर जावुन पुन्हा रोडवर पडलेल्या युर्नीकॉर्न मो.सा.क्र.एम.एच.४०. सी.आर.८८०५ला धडकल्याने मोटार सायकल चालक याचे डोक्याला व उजवे पायाला गंभीर मार लागुन तो जखमी झाला आहे. सदर अपघाताचे एकंदरीत चौकशी मध्ये असे निष्पन्न झाले की, यातील मोराझो कार क्र.एम. एच.४०.बी.एल.२४६८ चा चालक नामे सुभाष सुर्यभान बागडे व महिंद्र बोलेरो कार क्र.एम.एच.४०.सी.एच.०३४२ चा चालक नामे हिमांशु लिलाध बांदरे यांनी आपल्या ताब्यातील कार ह्या भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने सदर होवुन यातील दिलीप जानबाजी परतेकी यांना गंभीर जख करण्यास कारणीभुत ठरले आहे. या स्वरुपाच्या फिर्याद वरुन आरोपीविरुध्द भा.दं.वि. कलम २७९, ३३७ सहकलम ३४ व मोटार वाहन कायदा कलम १८४ चे अपराधा करीता अपराध क्रमांक ३५२/२०२३ ची नोंद करण्यात आली.

३. वरील प्रमाणे गुन्हा नोंदविल्यानंतर तपास पो.हवा. ब.नं.८०६ तुलशीराम इंगळे यांनी केला तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा केला, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले. प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे व इतर साक्षीदारांचे बयाण नोंदविले. तपासाअंती आरोपी विरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

**४.** आरोपीं विरुध्द निशाणी क्र.२५ वर भारतीय दंड संहीता कलम २७९, ३३७, ३३८ सहकलम १८४ मोटार वाहन कायदा प्रमाणे दोषारोप ठेवला. सदर दोषारोपातील मजकुर आरोपींना त्याच्या बोलीभाषेत मराठीमध्ये वाचुन दाखविण्यात आला. आरोपींने सदर गुन्हा नाकबुल असल्याचे सांगुन संपरीक्षेची मागणी केली. तसेच आरोपींविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१) नुसार नि.क्र.२५ वर नोंदविण्यात आला. आरोपीने खोटी केस असल्याचे सांगितले.

**५.** उपलब्ध अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा व दोन्ही पक्षांचा विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ आले आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी पुढे दिले आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले काय की, १३/०९/२०२३ रोजी दुपारी ०१.१५ ते ०१.२५ वाजताच्या दरम्यान मौजा नयाकुंड ते आमडी फाटा रोड वर आरोपी क्र. १ व २ हे त्याच्या ताब्यातील मोराज्ञो कार क्र.एम.एच.४०.बी.एल.२४६८ व महिंद्र बोलेरो कार क्र.एम.एच.४०.सी.एच.०३४२ हयगयीने निष्काळजीपणे भरधाव वेगाने दुसऱ्याच्या जिवास धोका निर्माण होईल अशा पध्दतीने चालवितांना मिळून आले ? | नाही |
| २. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले काय की, वर नमुद केलेल्या तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींने त्यांचे ताब्यातील मोराज्ञो कार | नाही |

| | | |
|---|---|---|
| | क्र.एम.एच.४०.बी.एल.२४६८ व महिंद्र बोलेरो कार क्र.एम.एच.४०.सी.एच.०३४२ हयगयीने निष्काळजी पणे भरधाव वेगाने चालवुन युर्नीकॉर्न मो.सा.क्र.एम.एच.४०. सी.आर.८८०५ ला धडक देऊन दिलीप परतेती यांना दुखापत पोहोचवली ? | |
| ३. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले काय की, वर नमुद केलेल्या तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींने त्यांचे ताब्यातील मोराज्ञो कार क्र.एम.एच.४०.बी.एल.२४६८ व महिंद्र बोलेरो कार क्र.एम.एच.४०.सी.एच.०३४२ हयगयीने निष्काळजी पणे भरधाव वेगाने चालवुन युर्नीकॉर्न मो.सा.क्र.एम.एच.४०. सी.आर.८८०५ ला धडक देऊन दिलीप परतेती यांना गंभीर दुखापत पोहोचवली ? | नाही |
| ४. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले काय की, वर नमुद केलेल्या तारीख, वेळी व ठिकाणी आरोपी त्याचे ताब्यातील मोराज्ञो कार क्र.एम.एच.४०.बी.एल.२४६८ व महिंद्र बोलेरो कार क्र.एम.एच.४०.सी.एच.०३४२ हयगयीने निष्काळजी पणे भरधाव वेगाने रस्त्याची परिस्थिती न पाहता चालवितांना मिळून आले? | नाही |
| ५. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता |

<u>**कारणमिमांसा**</u>

**<u>मुद्दा क्र. १ ते ४  करीता</u>**

६. आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने एकुण दोन साक्षीदाराची साक्ष नोंदविली. सदर अपघातातील जखमी दिलीप जानबाजी परतेती तसेच फिर्यादी अशोक उईके, पंच साक्षीदार अक्षय कुटले, जयंतकुमार भातकुलकर, पोलीस साक्षीदार रामदासजी मसराम तसेच तपासी अंमलदार तुळशीराम इंगळे यांना साक्ष समन्स तामील होऊन सुद्धा अभियोगपक्ष त्यांची उपस्थिती संपादित करु शकला नाही. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करण्याकरीता आपली भिस्त घटनास्थळ पंचनामा या दस्तावर ठेवली.

७. विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता व आरोपीच्या विद्वान विधीज्ञाचा युक्तीवात ऐकण्यात आला.

८. रवी (सा.क्र.१) हा घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून याने असे कथन केले आहे की, तो आरोपीस ओळखत नाही. घटनेबाबत त्याला काही माहीत नाही. त्याने हे नाकारले की आमडी ते पारशिवनी रोडवर प्रवास करीत असता त्याच्यासमोर अपघात घडला. या साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नाही.

९. सुधीर (सा.क्र.२) हा घटनास्थळ पंचनामावरील साक्षीदार असून त्याने असे कथन केले की, पोलीसांनी त्यायला दि. १३.०९.२०२३ रोजी नयाकुंड आमडी रोडवर नर्सरीजवळ अपघाताचा पंचनामाकरिता

बोलाविले होते. पोलीसांनी त्याच्यासमक्ष पंचनामा लिहीला. घटनास्थळावर एक चार चाकी वाहन उभे होते. त्याचा क्रमांक एम. एच. ४० बी. एल. २४६८ असा होता.

**१०.** अभियोगपक्षाच्या कथनानुसार, जखमी दिलीप परतेती हा मोटरसायकलने जात असताना त्याचा मोबाईल रस्त्यावर पडला. सदर मोबाईल शोधण्यासाठी तो मोटरसायकल वळवीत असताना आरोपींनी त्यांचे चारचाकी वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून त्यास धडक दिली, त्यामुळे तो जखमी झाला. सदर घटनेच्या अनुषंगाने आरोपींविरुद्ध भा.दं.वि. कलम २७९ व ३३७, ३३८ सहकलम ३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

**११.** अभियोगपक्षाकरिता जखमी दिलीप परतेती हा घटनेचा महत्त्वाचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. तथापि, त्यास न्यायालयामार्फत वारंवार समन्स/नोटीस बजावूनही तो न्यायालयासमक्ष हजर झाला नाही. त्यामुळे घटनेच्या वेळी वाहन कोण चालवीत होते, वाहन निष्काळजीपणे चालविले गेले काय तसेच आरोपींच्या कृतीमुळेच अपघात घडला काय, या मूलभूत बाबींवर अभियोगपक्षास प्रत्यक्ष साक्ष उपलब्ध झालेली नाही.

**१२**. अभियोगपक्षाने पंच साक्षीदार तपासून घटनास्थळाचा पंचनामा त्याच्या समक्ष करण्यात आल्याचे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, केवळ घटनास्थळाचा पंचनामा सिद्ध झाल्याने आरोपीनेच संबंधित वाहन निष्काळजीपणे चालविले होते, अथवा त्याच्या निष्काळजीपणामुळेच

जखमीस धडक बसली, हे सिद्ध होत नाही. पंच साक्षीदार हा अपघाताचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसल्याने त्याची साक्ष आरोपीच्या निष्काळजीपणाबाबत पुरेशी ठरत नाही.

**१३**. याशिवाय, या प्रकरणातील फिर्यादी तसेच तपासी अधिकारी यांची तपासणी अभियोगपक्षाकडून झालेली नाही. त्यामुळे तपासाची बाब, आरोपीविरुद्ध करण्यात आलेल्या आरोपांना पुष्टी देणारी परिस्थिती आणि तपासातून निष्पन्न झालेल्या बाबी यांना आवश्यक त्या पुराव्याचे अधिष्ठान उपलब्ध होत नाही.

**१४**. आरोपीविरुद्ध भा.दं.वि. कलम २७९,३३७,३३८ अन्वये अपराध सिद्ध करण्यासाठी केवळ अपघात घडला आणि त्यामध्ये एखादी व्यक्ती जखमी झाली, एवढेच पुरेसे नाही. अभियोगपक्षास आरोपीच संबंधित वाहन चालवीत होता आणि त्याने ते वाहन अशा प्रकारे चालविले की त्यातून मानवी जीवनास धोका निर्माण झाला किंवा संबंधित व्यक्तीस दुखापत झाली, ही बाब वाजवी संशयाच्या पलीकडे सिद्ध करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणात ही मूलभूत बाब अभियोगपक्षास विश्वसनीय व कायदेशीर पुराव्याद्वारे सिद्ध करता आलेली नाही.

**१५**. तसेच, भा.दं.वि. कलम ३३७ व ३३८ अन्वये अपराध सिद्ध करण्यासाठी जखमी व्यक्तीस झालेल्या दुखापतीचे स्वरूप व ती दुखापत सदर अपघातामुळेच झाली असल्याचे वैद्यकीय पुराव्याने सिद्ध होणे

आवश्यक आहे. त्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्याचा पुरावा महत्त्वाचा ठरतो. मात्र, अभियोगपक्षाकडून संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याची तपासणी झालेली नाही. त्यामुळे जखमीस झालेल्या दुखापतीबाबत आवश्यक वैद्यकीय पुरावा देखील अभिलेखावर उपलब्ध नाही. तसेच जखमीची सुद्धा तपासणी झालेली नाही.

**१६**. अभियोगपक्षाचा संपूर्ण पुरावा विचारात घेतल्यास, आरोपींनी संबंधित वेळी संबंधित चारचाकी वाहन चालविले होते, वाहन त्यांनी निष्काळजीपणे किंवा बेदरकारपणे चालविले आणि त्याच निष्काळजीपणामुळे दिलीप परतेती यास धडक होऊन त्यास दुखापत झाली, या सर्व आवश्यक बाबी वाजवी संशयाच्या पलीकडे सिद्ध झालेल्या नाहीत. सबब मुद्दा क्र. १ ते ४ चा निष्कर्श मी नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.५ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. १ व २ यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५ (१) अन्वये भा.द.वी. १८६० चे कलम २७९,३३७,३३८ सहकलम १८४ मोटार वाहन कायदानुसार शिक्षापात्र असलेल्या गुन्हयांच्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे वैयक्तीक व जमानत पत्र रद्द करण्यात येते.

३. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ)च्या तरतुदीच्या

पुर्ततेसाठी आरोपींनी प्रत्येकी रु.७,५००/–वैयक्तीक जातमुचलका व जामीन कतबा दयावा.

(न्यायनिवाडा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2026.08.12 19:07:02 +0530

(**जी.ओ. वानखडे**)

दिनांक १२/०८/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
पारशिवनी.

**जोडपत्र** **भाग 'क'**

**[फौजदारी नियमावली प्रकरण VI परिच्छेद 44(iii)**

अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाचे साक्षीदार यांची यादी

**अ. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी**

| अनुक्रमणिका | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | रवी रामुजी कडू | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| अ.सा.क्र.२. | सुधीर नामदेवजी चव्हान | पंच साक्षीदार |

**ब. आरोपीच्या साक्षीदारांची यादी**

| अनुक्रमणिका | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| – | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

| अनुक्रमणिका | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| – | निरंक | निरंक |

**अभियोगपक्षाने दाखल केलेल्या दस्तांच्या निशाणी क्रमांकाची यादी**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | नि.क्र.२५/अ.सा.क्र.१ | शपथेवर साक्ष |
| २. | नि.क्र.२५/अ.सा.क्र.२ | शपथेवर साक्ष |
| ३. | नि.क्र.३४/अ.सा.क्र.२ | घटनास्थळ पंचनामा |
| ४. | नि.क्र.३५ /अ.सा.क्र.२ | समन्स |

**आरोपीस मान्य असले ले दस्ताऐवज**

| अनुक्रमणिका | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**आरोपीने दाखल केलेल्या दस्तांच्या निशाणी क्रमांकाची यादी**

| अनुक्रमणिका | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**न्यायालयाने स्वतःहुन दिलेल्या दस्तांच्या निशाणी क्रमांकाची यादी**

| अनुक्रमणिका | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**आर्टिकल / चीजवस्तु**

| अनुक्रमणिका | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2026.08.12 19:07:12 +0530

पारशिवनी **(जी.ओ. वानखडे)**

दिनांक १२/०८/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी

पारशिवनी. जि. नागपूर

# <u>शेरा</u>

मी शपथेवर सांगतो की, या पि.डी.एफ. न्यायनिवाडा फाईल मधील मजकुर मुळ न्यायनिवाडयातील मजकुराचे शब्द नी शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव :– श्री. अभिजीत भीमराव तामगाडगे
( लघुलेखक ग्रेड – ३ )

कोर्टाचे नावः – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पारशिवनी

| | |
|---|---|
| Argument heard on | 12.08.2026 |
| Judgment delivered on | 12.08.2026 |
| Transcription ready on | 12.08.2026 |
| Judgment checked and singed on | 12.08.2026 |
| Uploaded on | 12.08.2026 |